| | | |
|---|---|---|
|  | महाराष्ट्र शासन<br>**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव**<br>**GOVERNMENT MEDICAL COLLEGE, DHARASHIV**<br>कोविड-19 इमारत, जिल्हा रुग्णालय आवार, धाराशिव. (महाराष्ट्र) 413 501<br>**e-mail:** deangmcosmanabad@gmail.com | GOVERNMENT MEDICAL COLLEGE, DHARASHIV |

जा.क्र.शावैमधा/यंत्रभांडार/अग्निशामक यंत्र/दरपत्रके/ 3271 /२०२६, दिनांक:25 /०९/२०२६

प्रति,

-------------------------

-------------------------

-------------------------.

विषय:- राज्य योजना अंतर्गत योजना (नॉन-प्लॅन) सन २०२६-२०२७ वर्षातील मंजूर अनुदानातून अग्नीशामक यंत्र/उपकरणे पुनर्भरण तसेच नवीन खरेदी करणेबाबत दरपत्रके...

संदर्भ:- १) अग्निसुरक्षा समिती बैठक इतिवृत्त क्र. शावैमधा/यंत्रभांडार/अग्निरोधक यंत्रणा/इतीवृत्त/3270/२०२६, दिनांक: 24 /०९/२०२६

२) दिनांक २५.०९.२०२६ रोजीची मंजूर कार्यालयीन टिप्पणी.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव इमारत व परिसरामध्ये कार्यरत विद्यार्थी, अध्यापक वर्ग, कर्मचारी वृंद तसेच शैक्षणीक लेक्चर हॉल, प्रयोगशाळा, सर्व्हर रुम, उपहारगृहे, प्रशासकीय कार्यालय, शासकीय कागदपत्रे, यंत्र/ उपकरणे इ. जीवीत तसेच स्थावर व जंगम मालमत्तेची अग्निजन्य आपत्तीपासून सुरक्षा विचार करता मुदत संपुष्टात आलेली अग्नीशमन यंत्रे पुनर्भरण करणे व आवश्यक असलेली नवीन खरेदी करणे यासाठी कार्यालयाकडुन दरपत्रके प्रसिध्द करण्याची कार्यवाही राबविण्यात येत आहे.

तरी, उपलब्ध अग्निशमन नळकांडे पुनर्भरण करणे तसेच नवीन अग्निशामक यंत्र खरेदीकामी दरपत्रके मागविण्यात येत असुन दि.24/०९/२०२६ ते दि.09/१०/२०२६ पर्यंत इच्छुक निविदाधारकांनी अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव येथे कार्यालयीन वेळेत सिलबंद लिफाफा मध्ये आपले दरपत्रक करार सादर करण्या बाबत निविदा मागविण्यांत येत आहे.

25/09/26

(डॉ. शैलेंद्र चौहान)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
धाराशिव.

प्रत:- १) सुचना फलक जाहीर नोटिस, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव.

२) संकेतस्थळ, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव.

३) वैद्यकीय अधिक्षक तथा अध्यक्ष, अग्निसुरक्षा समिती, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव.

शासकिय वैद्यकिय महाविद्यालय उस्मानाबाद सत्यमेव जयते

# जाहिरात

तरी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय इमारत व परिसरासाठी अत्यावश्यक असलेली अग्निशमन यंत्रे पुनर्भरण करणे तसेच नवीन खरेदी कामी दरपत्रके मागविण्यात येत असुन दि.२५/०९/२०२६ ते दि.०१/१०/२०२६ पर्यंत इच्छुक निविदाधारकांनी अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव येथे कार्यालयीन वेळेत सिलबंद लिफाफा मध्ये आपले दरपत्रक करार सादर करावेत.

**दरपत्रके सादर करतेवेळी अधिकृत लेटरहेड वर खालील प्रमाणे विहित नमुन्यातच माहिती सादर करावी अन्यथा निविदा प्रक्रियेतुन अपात्र करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

| अ.क्र. | उपकरणाचा तपशील | वजन/आकार | कार्यवाही | प्रति नग किंमत | जीएसटी (%) रक्कम | एकुण किंमत (GST सह) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ABC (Ball Type) | 5 Kg | Refilling | | | |
| 2 | ABC (Dry Powder) | 6 Kg | Refilling | | | |
| 3 | CO2 | 4.5 Kg | Refilling | | | |
| 4 | ABC (Dry Powder) | 9 Kg | Refilling | | | |
| 5 | ABC (Ball Type) | 5 kg | New | | | |
| 6 | ABC (Dry Powder) | 1 kg | New | | | |
| 7 | ABC (Dry Powder) | 2 kg | New | | | |
| 8 | ABC (Dry Powder) | 5 kg | New | | | |
| 9 | ABC (Dry Powder) | 6 kg | New | | | |
| 10 | ABC (Dry Powder) | 9 kg | New | | | |
| 11 | CO2 | 4.5 kg | New | | | |

**अटी व शर्ती:**

०१) दरपत्रक मोहरबंद लिफाफा दिनांक ०१/१० /२०२६ पर्यंत सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवावेत. जाहिर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत/ ग्राह्य धरले जाणार नाहीत.

०२) सुचना फलक/ संकेतस्थळावरील जाहिर नोटीस प्रमाणे इच्छुक कंपनीस दरपत्रक मोहरबंद लिफाफा सादर करण्याची मुभा देण्यात येत आहे. दरपत्रक मोहरबंद **लिफाफा "अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव" यांचे नावे** विहित मुदतीत कार्यालयास सादर करावा.

०३) दरपत्रक मोहरबंद लिफाफ्यावर **"अग्निशामक यंत्रे पुरवठा करणेबाबत दरपत्रके"** तसेच मोहरबंद लिफाफा जमा करण्याचा **अंतिम दिनांक** दरपत्रधारकाच्या नावाचा **शिक्का** इत्यादी नमुद असणे आवश्यक आहे.

०४) दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात सादर करावयाचे दस्तऐवज:

- एसटी (GST) क्रमांक असलेल्या अधिकृत लेटरहेडवर दरपत्रक
- जीएसटी प्राधिकृत प्रत
- पॅन कार्ड
- शॉप ॲक्ट
- ड्रग लायसन्स
- महाराष्ट्र शासनाकडुन प्रदान करण्यात आलेला अग्निशमन सेवा परवाना
- शासकीय कार्यालयामध्ये काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र (Valid PO)
- एकल दरपत्रक धारक असल्याबाबतचे हमीपत्र **"ANNEXURE-A"** (सोबत नमुना जोडला आहे).
- FIRE EXTINGUISHER INSTALLATION GUIDELINES हमीपत्र **"ANNEXURE-B"** (सोबत नमुना जोडला आहे)
  वरील सर्व दस्तऐवज जोडणे बंधनकारक आहे **(दिलेल्या क्रमाने जोडण्यात यावेत)**.

०५) निविदा सादर करतेवेळी FIRE EXTINGUISHER INSTALLATION GUIDELINES (**"ANNEXURE-B"** सोबत नमुना जोडला आहे) मध्ये नमुद केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करण्याच्या अनुषंगाने पुरवठा करण्यात येणारी अग्निशामक यंत्रे प्रस्थापित करणे/ देखभाल दुरुस्ती/ वेळोवेळी तपासणी अहवाल सादर करण्यास संमती असलेबाबत रु.५०० च्या बॉण्डवर नोटरीसह हमीपत्र दरपत्रकामध्ये जोडणे बंधनकारक आहे.

०६) निविदा घोषित झालेल्या न्युनतम दरधारकाने पुरवठा आदेश प्राप्त करण्यापुर्वी उक्त मार्गदर्शक तत्वानुसार आवश्यक अग्निशामक यंत्राचा प्रकार, नग संख्या, प्रस्थापित करावयाचे ठिकाण याबाबत सविस्तर तपासणी अहवाल सादर करणे बंधनकारक आहे.

०७) उक्त मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करण्याच्या मोबदल्यापोटी कोणतेही अतिरिक्त शुल्क अदा करण्यात येणार नाही किंवा तशी कोणतीही मागणी हे कार्यालय मान्य करणार नाही.

शासकिय वैद्यकिय महाविद्यालय उस्मानाबाद सत्यमेव जयते

०८) सर्वात कमी दर सादर करणाऱ्या पात्र निविदाधारकाचे दर हे पूढिल ०६ महिन्यांकरिता गोठविण्यांत येतील. कार्यालयाच्या आवश्यकतेनूसार वेळोवेळी त्याच दराने मागणी केलेली सामुग्री विहित वेळेत पूरवठा/ प्रस्थापित करणे बंधनकारक राहिल.

०९) अपवादात्मक परिस्थितीमुळे उक्त कोणत्याही अटी अथवा शर्तीमध्ये आवश्यकतेनुसार अंशत: बदल करणे अथवा प्राप्त झालेली दरपत्रके कोणतेही कारण/पुर्वसुचना न देता नाकारणे तसेच कोणत्याही स्तरावर निविदा प्रक्रिया रद्द करणे इ. अधिकार संस्थाप्रमुख (अधिष्ठाता) यांनी राखुन ठेवलेले आहेत.

**नोंद:- सदर दर पत्रके मा. अधिष्ठाता यांचे दालनात उघडण्याची वेळ दिनांक. ०३/१० /२०२६ रोजी ११.३० वाजता राहिल. सदर नियोजित वेळेत कोणताही बदल झाल्यास निविदाधारकांना तशी पुर्वसुचना देण्यात येईल.**

२४/०१/२६

(डॉ. शैलेंद्र चौहान)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
धाराशिव

शासकिय वैद्यकिय महाविद्यालय उस्मानाबाद
सत्यमेव जयते

| एकल दरपत्रक अधिकृत विक्रेता/पुरवठादार/कंपनी यांचे लेटरहेडवर |
|---|

Letter No. Date :-

प्रति
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
धाराशिव.

विषय :- एकल दरपत्रक सादर करणेसंबंधीचे हमीपत्र सादर करणेबाबत...

संदर्भ :- आपले दरपत्रक मागणी पत्र
क्रमांक. ____________________
दिनांक ____________________

महोदय

संदर्भांकित दरपत्रक मागणी पत्रानुसार मागणी करण्यात आलेले एकल दरपत्रक सादर करण्यासंबंधीचे हमीपत्र मी खालील प्रमाणे सादर करीत आहे.

## <u>हमीपत्र (Undertaking)</u>

याद्वारे हमी देतो की, दरपत्रक प्रक्रियेसाठी एकच दरपत्रक सादर करीत आहे. आमच्याच फर्मशी निगडीत असलेल्या कुठल्याही व्यक्तीच्या नावे किंवा अप्रत्यक्षपणे केवळ आम्हास लाभ होईल, अश्याप्रकारे दुसरे दरपत्रक दरपत्रकप्रक्रियेमध्ये सादर केलेला नाही. तसेच माझा/आमचा आपल्या कार्यालयातील खरेदी प्राधिकाऱ्यांशी कुठलेही हितसंबंध नाही.

उक्त बाब भविष्यात असत्य/खोटी आढळुन आल्यास, सर्वस्वी जबाबदारी आमची राहील. नियमानुसार होणाऱ्या कार्यवाहीस मी/आम्ही पात्र असू. तद्संबंधी माझी/आमची कुठलीही हरकत राहणार नाही. अशी याद्वारे हमी देत आहे.

| अधिकृत वितरकाचे नाव व स्वाक्षरी,<br>शिक्का अणि मोहर<br>Authorized Person Name,<br>Signature<br>with Stamp and Seal |
|---|

**ANNEXURE-B**

(On Rs.500/- Notrized Bond Paper)

To
Dean,
Government Medical collage,
Dharashiv-413501

**Ref: Your Tender/Quotation No--------------- & Date: ---------------**

**Sub:** Affedavite about FIRE EXTINGUISHER INSTALLATION GUIDELINES

१. मुख्य प्रतिष्ठापन तत्त्वे (Core installation principles)

- संपूर्ण इमारतीमध्ये ISI-चिन्हांकित पोर्टेबल (सहज हलवता येणारे) अग्निशामक यंत्रे उपलब्ध करा. ही यंत्रे संभाव्य धोके लक्षात घेऊन निवडलेली असावीत आणि सहज पोहोचता येईल अशा ठिकाणी बसवावीत.
- प्रत्येक मजल्यावरील एक्झिट (बाहेर पडण्याचे मार्ग), सुरक्षित जिने, कॉरिडॉर, नर्सिंग स्टेशन्स आणि निश्चित केलेल्या धोकादायक खोल्यांमध्ये यंत्रे प्रस्थापित करणे.
- मंजूर वॉल ब्रॅकेट्स (भिंतीवरील स्टँड) किंवा स्टँडवर यंत्रे घट्ट बसवा, ज्यावर अग्निशामक उपकरणांचे चिन्ह स्पष्ट दिसेल.
- मजल्यानुसार एक फायर प्लॅन (अग्निशामक योजना) तयार करणे. ज्यामध्ये प्रत्येक अग्निशामक यंत्राचा प्रकार, त्याची क्षमता/रेटिंग, त्याचे अचूक ठिकाण दर्शवलेली असावी.

२. क्षेत्रानुसार शिफारस केलेली प्रथम-प्रतिसाद उपकरणे (Recommended first-response equipment by area)

| क्षेत्र (Area) | प्राथमिक अग्निशामक यंत्र (Primary extinguisher) | प्रतिष्ठापन / ठेवण्यासंबंधीच्या नोंदी (Installation / positioning notes) |
|---|---|---|
| वर्गखोल्या, कॉरिडॉर | ABC ड्राय पावडर | बाहेर पडण्याच्या (आपत्कालीन) मार्गावर आणि स्पष्ट चिन्हे असलेल्या, सहज पोहोचता येईल. |
| इलेक्ट्रिकल पॅनल्स, यूपीएस (UPS)/सर्व्हर, डायग्नोस्टिक्स | CO२ (कार्बन डायऑक्साइड) | इलेक्ट्रिकल धोक्याच्या अगदी बाहेर किंवा लागूनच प्रस्थापित करणे. |
| प्रयोगशाळा (Laboratories) | जोखीम मूल्यांकनानुसार CO२ आणि ABC | तेथील प्रत्यक्ष रसायने आणि प्रक्रियांच्या आधारे उपलब्धता ठेवणे |
| व्यावसायिक स्वयंपाकघर (Commercial kitchen); | वेट केमिकल (Wet chemical) पूरक म्हणून ABC/CO२ | खाण्याचे तेल / डीप-फॅट फ्रायरमुळे लागणाऱ्या आगीच्या ठिकाणी प्रस्थापित करणे. |
| फार्मसी, स्टोअर्स, लिनन/लॉन्ड्री | ABC ड्राय पावडर | ज्वलनशील पदार्थांवर नियंत्रण ठेवा; मंजूर आराखड्यानुसार (design) आवश्यक तिथे कायमस्वरूपी सुरक्षा व्यवस्था (fixed protection) जोडा. |

**३. अग्निशामक यंत्र प्रतिष्ठापन अंतर मार्गदर्शिका (Extinguisher installation distance guide):**

संरक्षित क्षेत्रातील सर्वात दूरच्या बिंदूपासून ते सर्वात जवळच्या योग्य अग्निशामक यंत्रापर्यंतचे अंतर, प्रत्यक्षात चालण्याच्या अडथळा नसलेल्या मार्गाने मोजा. यंत्र अशा ठिकाणी ठेवा जिथे आग लागल्यास सुरक्षितपणे पोहोचता येईल.

| क्षेत्र / आगीचा प्रकार (Area / fire class) | जास्तीत जास्त पोहोचण्याचे अंतर (Maximum travel distance) | सामान्य वापर (Typical application) |
|---|---|---|
| क्लास A – कमी किंवा मध्यम धोका | २० मीटर | वॉर्ड्स, ओपीडी (OPD), वर्गखोल्या, कार्यालये आणि सामान्य कॉरिडॉर. |
| क्लास A – जास्त धोका | १५ मीटर | जास्त ज्वलनशील भार / स्टोरेज (साठवणूक) क्षेत्रे. |
| क्लास B किंवा C | १५ मीटर | योग्य चिन्हांकित अग्निशामक यंत्राचा वापर करून, ज्वलनशील द्रव/वायूचे धोके आणि इलेक्ट्रिकल-जोखमीची क्षेत्रे. |
| क्लास D | २० मीटर | ज्वलनशील धातूंचे (combustible-metal) धोके, उपलब्ध असल्यास. |
| क्लास F | १० मीटर | व्यावसायिक स्वयंपाकाचे तेल / चरबीचे धोके; वेट-केमिकल (wet-chemical) सुरक्षा पुरवा. |

**४. तपासणी, सर्व्हिसिंग आणि नोंदी (Inspection, servicing and records)**

| वारंवारता (Frequency) | कृती / कारवाई (Action) | जतन करायची नोंद (Record to retain) |
|---|---|---|
| मासिक (Monthly) | अग्निशामक यंत्रापर्यंत जाण्याचा मार्ग, सील (Seal), प्रेशर इंडिकेटर (दाब दर्शक - जेथे बसवला असेल तिथे), होस/नोझल, लेबल, सर्व्हिसिंगची पुढील तारीख आणि प्रत्यक्ष स्थितीची तपासणी करणे. | मजला तपासणी चेकलिस्ट (Floor inspection checklist) आणि दोष-निवारण नोंदवही (corrective-action log) कार्यालयास सादर करुन संबंधित अधिकारी यांची स्वाक्षरी घेणे. |
| त्रैमासिक (Quarterly) (लागू असल्यास) | लागू पडेल त्याप्रमाणे अलार्मचा आवाज (audibility) आणि हायड्रंट/होस-रीलची उपलब्धता तसेच कामगिरीची चाचणी घेणे. | चाचणी अहवाल (Test report) आणि दोष-निवारण नोंद (fault-closure record). |
| वार्षिक (Annually) | लागू असलेल्या भारतीय मानकांचे (Indian Standards) पालन करून एका सक्षम संस्थेद्वारे (competent agency) उपकरणांची तपासणी/सर्व्हिसिंग आणि प्रमाणित (certified) करून घेणे. | सर्व्हिस सर्टिफिकेट्स (सेवा प्रमाणपत्रे) आणि अग्निशामक नोंदवही (extrunguisher register) अद्यायावत करुन कार्यालयास त्याची प्रत सादर करणे. |

**Stamp with Seal**
**OEM/ Distributors**